**मृद व जलसंधारण विभागातून सेवा प्रत्यार्पित करण्यात आलेल्या उप अभियंता (स्थापत्य) यांना पदस्थापना देणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**

**जलसंपदा विभाग, मंत्रालय,**

**शासन आदेश क्र: WRDM-२०३९/६२/२०२६-WRDM_(ESTT_CLASS_२) (e-१७५८३९३)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मुंबई- ४०० ०३२.

दिनांक:- २२ ऑक्टोबर, २०२६.

**संदर्भ:-**

१) मृद व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्र.आस्थाप-२०१६/प्र.क्र.८८(भाग-९)/जल-२, दि.३१/०५/२०१७.
२) मृद व जलसंधारण विभाग, शासन आदेश, क्र.आस्थाप-२०२०/प्र.क्र.२८७/जल-२, दि.१०/०८/२०२०.
३) मृद व जलसंधारण विभाग, शासन आदेश, क्र.आस्थाप-२०२४/प्र.क्र.२९४/जल-२, दि.३०/०४/२०२६.
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे कार्यालयाचे कार्यमुक्ती आदेश जा.क्र.ठाजिप/ल.पा./आस्था-१/वशी/२०२६, दि.१२/०६/२०२६.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर कार्यालयाचे कार्यमुक्ती आदेश जा.क्र.जिपना/लपावि/स्था-१/१०३३/२०२६, दि.२३/०६/२०२६.
६) श्रीम.सुहानी सचिन होवाळे, उप अभियंता (स्थापत्य) यांचे विनंती अर्ज दि.१७/०६/२०२६ व दि.२२/०६/२०२६.
७) श्री.अजय हिरामन लाडसे, उप अभियंता (स्थापत्य) यांचा विनंती अर्ज दि.२४/०६/२०२६.

**शासन आदेश :-**

मृद व जलसंधारण विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील आदेशानुसार श्रीम.सुहानी सचिन होवाळे, उप अभियंता (स्थापत्य) व श्री.अजय हिरामन लाडसे, उप अभियंता (स्थापत्य) हे मृद व जलसंधारण विभागात प्रतिनियुक्तीने कार्यरत होते. मृद व जलसंधारण विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्र. ३ येथील दोन स्वतंत्र आदेशान्वये श्रीम.होवाळे व श्री.लाडसे, उप अभियंता (स्थापत्य) यांची त्या विभागातील प्रतिनियुक्तीवरील सेवा जलसंपदा विभागास प्रत्यार्पित करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे कार्यालयाने श्रीम.होवाळे यांना व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर कार्यालयाने श्री.लाडसे यांना अनुक्रमे उपरोक्त संदर्भ क्र.४ व क्र.५ येथील दि.१२/०६/२०२६ व दि.२३/०६/२०२६ रोजींच्या पत्रान्वये खालील तक्त्यात त्यांच्या नावासमोर रकाना क्र.४ येथे नमूद दिनांकास मृद व जलसंधारण विभागातील प्रतिनियुक्तीच्या पदावरुन कार्यमुक्त केले असल्याचे कळविले आहे. सदर अभियंते हे त्यांच्या नावासमोर रकाना क्र.५ येथे नमूद दिनांकास जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई येथे रुजू झाले असून त्यांना पदस्थापना देणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | अभियंत्याचे नाव | मृद व जलसंधारण विभागाने सेवा प्रत्यार्पित केल्याच्या आदेशाचा दिनांक | कार्यमुक्त केल्याचा दिनांक | जलसंपदा विभागात रुजू दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्रीम.सुहानी सचिन होवाळे, उप अभियंता (स्थापत्य) | दि.३०/०४/२०२६ | दि.१२/०६/२०२६ (म.पू.) | दि.१७/०६/२०२६ (म.पू.) |
| २ | श्री.अजय हिरामन लाडसे, उप अभियंता (स्थापत्य) | दि.३०/०४/२०२६ | दि.२३/०६/२०२६ (म.नं.) | दि.२४/०६/२०२६ (म.पू.) |

२. सदर अभियंत्यांची खालील तक्त्यात त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या पदावर पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | पदस्थापना |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | श्रीम.सुहानी सचिन होवाळे, उप अभियंता (स्थापत्य) | मुख्य अभियंता (ज.सं.), जलसंपदा विभाग, कोल्हापूर अंतर्गत अधीक्षक अभियंता, सातारा सिंचन मंडळ, सातारा अंतर्गत कोयना सिंचन विभाग, कोयनानगर अंतर्गत कोळकेवाडी धरण व्यवस्थापन उपविभाग, अलोरे या रिक्त पदी. |
| २ | श्री.अजय हिरामन लाडसे, उप अभियंता (स्थापत्य) | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर अंतर्गत अधीक्षक अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ, चंद्रपूर येथील सहायक अधीक्षक अभियंता या रिक्त पदी. |

३. सदर अभियंत्यांनी उपरोक्त तक्त्यात त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. सदर पदावर रुजू झाले नाही तर "महाराष्ट्र नागरी सेवा (वतुर्णक) नियम, १९७९" मधील नियम ३ चा भंग केल्याच्या कारणास्तव त्यांच्या विरुध्द "महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९" मधील तरतुदीनुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

४. संबंधित मुख्य अभियंता यांनी सदर अभियंत्यांना सदर आदेशानुसार पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रुजू करुन घ्यावे. शासनाने केलेल्या आदेशात क्षेत्रीय स्तरावर कोणतेही बदल करण्यात येऊ नयेत. पदस्थापनेच्या ठिकाणी पद रिक्त नसेल अथवा अन्य कारणांमुळे बदली कार्यान्वित करण्यास प्रशासकीय अडचण उद्भवत असेल तर, अशा बाबतीत शासनास तात्काळ अवगत करून अहवाल सादर करावा.

५. तसेच, सदर अभियंते हे पदस्थापनेच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाल्या याबाबत शासनास doesttclass2.wrd@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर त्वरीत कळवावे.

६. संबंधित मुख्य अभियंता /अधीक्षक अभियंता यांना कळविण्यात येते की, त्यांनी शासन पत्र क्र.संकीर्ण-२०१७/(१७३/१७)/आ (वर्ग-२), दि.१२/०७/२०१७ अन्वये देण्यात आलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करावी.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२६१०२२१५४७३९२६२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

VIKRAMSINH PRAKASHRAO SHINDE

Digitally signed by VIKRAMSINH PRAKASHRAO SHINDE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Water Resources Department, 2.5.4.20=1FBCA76D11AD25E383A0E28DA215F01E12183C1B565DDD29AAF1FFBFAD8E9E9C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6F385E4139AB144CAAF92B440B55068479C3789EA50EC85EB7A16B7C932CB397, cn=VIKRAMSINH PRAKASHRAO SHINDE
Date: 2026.10.22 15:49:16 +05'30'

**(विक्रमसिंह प्र. शिंदे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति :-**

१) मा.मंत्री (जलसंपदा)(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
२) मा.मंत्री (जलसंपदा)(विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
३) प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
७) मुख्य अभियंता (ज.सं.), जलसंपदा विभाग, कोल्हापूर.
८) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर
९) अधीक्षक अभियंता, सातारा सिंचन मंडळ, सातारा.
१०) अधीक्षक अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ, चंद्रपूर.
११) जिल्हा कोषागार अधिकारी, रत्नागिरी/ चंद्रपूर
१२) श्रीम.सुहानी सचिन होवाळे, उप अभियंता (स्थापत्य), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) श्री.अजय हिरामन लाडसे, उप अभियंता (स्थापत्य), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) आ (वर्ग-२) कार्यासन संग्रहार्थ.